अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

(अधिकार प्रदत्त महाविद्यालय)

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

## NOTICE

नोटीस क्र. -205 दि. २२/०८/२०२५

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम व व्दितीय वर्ष बी.बी.ए, बी.बी.ए (सी.ए), बी.सी.ए (सायन्स) या शाखेमध्ये शिक्षण घेत असलेल्या (ओपन/एस.ई.बी.सी.) या कॅटेगरीतील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजना विद्यार्थ्यांना फॉर्म भरणेसाठी अत्यंत महत्वाची सूचना**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांचे परिपत्रकजा.क्र. तंशिविकापू/विवि/बीबीए-बीसीए शुल्क २०२४-२०२५/८४१ दि. ११ मार्च २०२५ नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ नुसार व दि. ०३/०२/२०२५ रोजीच्या शासननिर्णयामध्ये व्यवसायिक अभ्यासक्रमांसोबत बीबीए, बीबीए (सीए), बीसीए या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शुल्क प्रतिपूर्ती योजना व पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे.

सदर शिष्यवृत्ती योजना शासन महाडीबीटी मधून प्रदान करण्यात येणार आहे. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी व आपले शिष्यवृत्ती अर्ज आवश्यक कागदपत्रासह महाडीबीटी पोर्टलवर भरावेत.

**Website- www.mahadbt.maharashtra.gov.in**

**ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी मार्गदर्शक सूचनाखालीलप्रमाणे:-**

१) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये जे विद्यार्थी प्रथम व व्दितीय वर्ष बी.बी.ए, बी.बी.ए (सी.ए), बी.सी.ए (सायन्स) या शाखेमध्ये जे विद्यार्थी (ओपन/एस.ई.बी.सी) नुसार प्रवेशित आहेत अशा विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती योजनेचा फॉर्म भरावा.

२) तृतिय वर्षातील (टी.वाय.मधील) कोणत्याही विद्यार्थ्याला या योजनेचा लाभ मिळणार नसल्याने विद्यार्थ्यांनी या योजनेचे शिष्यवृत्ती फॉर्म भरू नयेत.

३) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या (ओपन) कॅटेगरीतील विद्यार्थ्यांसाठी उत्पन्नाची मर्यादा ८,००,०००/- (अक्षरी-आठ लाख) पर्यंत आहे. विद्यार्थ्यांनी मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

४) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या (एस.ई.बी.सी.) या कॅटेगरीतील विद्यार्थ्यांसाठी उत्पन्नाची मर्यादा ८,००,०००/- (अक्षरी-आठ लाख) पर्यंत आहे. परंतु ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे उत्पन्न आठ लाखापेक्षा अधिक आहे अशा विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र जोडणे/अपलोड करणे अनिवार्य आहे. मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

५) वडील हयात नसतील तर आईचे नावाचा तहसिलदार यांनी दिलेला २०२४-२५ मधील उत्पन्नाचा दाखला व सोबत वडीलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत जोडावी.

६) आधारकार्ड हे बँकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न (लिंक) असणे आवश्यक आहे.

७) मागील वर्षाचे मार्कशिट झेरॉक्स व इयत्ता १० वी चे गुणपत्रक जोडणे आवश्यक आहे.
८) विद्यार्थ्यांचे कॅप राउंड नुसार प्रवेश झालेले असल्याने प्रवेशाचे पत्र अपलोड करावे.
९) शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ चे प्रवेश फी चलन जोडावे.
१०) एस.ई.बी.सी. असल्यास त्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
११) डोमासाईल प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
१२) गॅप असेलतर गॅप ॲफिडेव्हिट आवश्यक आहे.
१३) महाडिबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करावे.

## विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्मकसा भरावा याबाबत महत्वाची सूचना

१४) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना करंट डिटेल्स या कॉलममध्ये फी पेड झिरो (शून्य) टाकणे अनिवार्य आहे.
१५) स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेल्स या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रॅन्ट मध्ये असेल तर Aided करावे व नॉन ग्रॅटमध्ये प्रवेश असेलतर UnAided करावे. तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.
१६) विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. जर एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचा फॉर्म भरल्यास एक योजना रिजेक्ट होतो व यामध्ये विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते.
१७) जे विद्यार्थी होस्टेलमध्ये प्रवेशित आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी पंजाबराव देशमुख वसतीगृह योजना आहे यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती योजनेचा फॉर्म भरत असताना होस्टेलची माहिती भरणे आवश्यक आहे तरच पंजाबराव देशमुख वसतीगृह योजनेचा फॉर्म भरता येतो.
१८) विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती योजनेचा ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव/डिपार्टमेंट/स्कीम/योजनेचे नाव सिलेक्ट करावे.

19) **College Name**- TuljaramChaturchand College of Arts, Science and Commerce (16164)

**Department Name** हे निवडताना Directorate of Technical Education हे सिलेक्ट करावे

**Scheme Name** : Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna (EBC) हे नाव निवडावे.

२०) विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे आपल्या कोर्सची माहिती निवडावी.

| Course Name | Course Category | Course Type | Course Stream | Type |
|---|---|---|---|---|
| B.B.A. (C.A.) | Management | Under Graduate Course | Bachelor of Business Administration in Computer Application | UnAided |
| BBA | Management | Under Graduate Course | BBA | UnAided |
| BCA | MCA | Under Graduate Course | BCA | UnAided |

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची आवश्यकता नाही. शिष्यवृत्ती फॉर्म भरणे संदर्भात वरील कोर्सच्या विद्यार्थ्यांना काही अडचणी, शंका असल्यास प्रशासन भवन येथे शिष्यवृत्ती विभागात संपर्क साधावा.

रजिस्ट्रार

प्राचार्य

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

D:\amsolankar\amsolankar\Scholarship 2024-2025\NOTICE 2024-25.docx